ला. प्र. वि.

अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– १९/०९/२०२५

## —: प्रेसनोट :—

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २९/२०२५ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| अटक आरोपी लोकसेवक | १) श्री. प्रशांत प्रकाश कासारे, कनिष्ठ पर्यवेक्षक<br>२) श्री. संतोष गोविंद मोहकर, पयवेक्षक<br>घनकचरा व्यवस्थापन, पी उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. १०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | तडजोडीअंती रु. ७,५००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे पी/उत्तर विभाग, घनकचरा व्यवस्थापन, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई येथे सफाई कामगार म्हणून काम करतात. दिनांक १२/०९/२०२५ रोजी मुकादम यांनी तपासणी केली असता, तक्रारदार हे एका जागी कचरा न उचलता निघून गेल्याचे आढळून आले, त्यानुसार त्यांनी त्यांचे रजिस्टवर तशी नोंद घेतली. तक्रारदार हे दुपारी हजेरी नोंदणीकरीता कार्यालयात गेले असता, सदरबाबत त्यांना माहिती समजली. त्यानतर तक्रारदार यांनी मुकादम व कनिष्ठ पर्यवेक्षक यांचेशी हुज्जत घातली व निघून गेले. त्यानंतर दिनांक १३/०९/२०२५ रोजी तक्रारदार पुन्हा हजेरी नोंदणीकरीत कार्यालयात गेले असता, मुकादम व कनिष्ठ पर्यवेक्षक यांनी त्यांची नोंदणी घेण्यास मनाई करून पर्यवेक्षक मोहकर व मुख्य पर्यवेक्षक नेरूळकर यांना भेट व नंतर कामावर ये असे सांगितले. त्यानंतर दिनांक १५/०९/२०२५ रोजी तक्रारदार यांनी लोकसेवक पर्यवेक्षक श्री. संतोष मोहकर यांची भेट घेतली असता, त्यांनी तक्रारदार यांचा माफीनामा लिहून घेतला व सदरचे प्रकरण मिटवण्याकरीता दहा ते पंधरा हजार दयावे लागतील असे सांगून लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १६/०९/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १७/०९/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे सदरहू प्रकरण मिटवण्याकरीता रू. १०,०००/- लाचेची मागणी करून लोकसेवक प्रशांत कासारे यांचेशी बोलून घेण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांनी लोकसेवक प्रशांत कासारे यांचेशी संपर्क केला असता, त्यांनी तडजोडीअंती रू. ७,५००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक १९/०९/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक संतोष मोहकर यांनी लाचेची रक्कम लोकसेवक प्रशांत कासारे यांना देण्यास सांगितले. त्यानुसार लोकसेवक प्रशांत कासारे यांना तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम रू. ७,५००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन लोकसेवक १) प्रशांत प्रकाश कासारे, कनिष्ठ पर्यवेक्षक व २) संतोष गोविंद मोहकर, पयवेक्षक, घनकचरा व्यवस्थापन विभाग, पी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्रीमती माधुरी माने, पोलीस निरीक्षक,** **पर्यवेक्षक अधिकारी :- श्री निलेश पाटील, पोलीस निरीक्षक**

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. गजेंद्र गणपत मांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८

व्हॉट्सअप क्र. :- **8828241064** मोबाईल ॲप :- **www.acbmaharashtra.net**
वेबसाईट :- **acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**
ईमेल :- **addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
फेसबुक :- **www.facebook.com - Maharashtra ACB**